MHRG140009462026

## न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय क्र.१, उरण.

एस.सी.सी. क्र. ४३२/२०२६ निशाणी क्र. ३

सरकार – वि – सलमान

**गुन्हयाचा तपशिल**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | : | १०.०८.२०२६ |
| २. | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | : | ११.०८.२०२६ |
| ३. | फिर्याददाराचे संपुर्ण नाव व पत्ता | : | **महाराष्ट्र सरकार** मार्फत<br>उरण वाहतुक शाखा,<br>नवी मुंबई |
| ४. | आरोपीचे संपुर्ण नाव व पत्ता | : | **सलमान अकबर अली,**<br>वय: ३३ वर्ष,<br>व्यवसाय - चालक<br>रा. महादेव बसडीला, पोस्ट कमरिया बुजुर्ग, तहसिल लक्ष्मीपुर, जिल्हा महाराजगंज, उत्तर प्रदेश. |

11/08/2026

एस.सी.सी. क्र. ४३२/२०२६
**सरकार वि. सलमान**

५. ज्याबद्दल फिर्याद दिली आणी जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशिल :

दिनांक १०.०८.२०२६ रोजी दुपारी ०१.०८ वाजताचे सुमारास दिघोडा, उरण येथे तुम्ही तुमचे ताब्यातील मोटर ट्रेलर क्र. एम. एच. ४६-डीसी ४७०१ मद्यप्राशन करुन चालवत असतांना मिळुन आला. त्यामुळे तुम्ही मोटर वाहन कायद्याचे कलम १८५, १३० (१)/१७७ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला असून त्याची मी दखल घेतली आहे.

याव्दारे मी असे निर्देश देतो की, तुमच्या विरूध्द वरील आरोपान्वये खटला चालविण्यात यावा.

11/08/2026

दिनांक : ११.०८.२०२६

एस. पी. वानखडे
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. १, उरण.

वरील गुन्हयाचा तपशील आरोपीला त्यांच्या भाषेत वाचुन दाखविण्यात आला तसेच समजावून सुध्दा सांगण्यात आला. आरोपीने गुन्हा कबूल असल्याचे सांगीतले. आरोपीचे म्हणणे/जबाब नोंदविण्यात आले.

11/08/2026

दिनांक : ११.०८.२०२६

एस. पी. वानखडे
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१, उरण.

## ६. आरोपीचा जबाब/म्हणणे

प्रश्न १ : तूम्हाला पोलीसांनी दाखल केलेल्या खटल्याच्या प्रती मिळाल्या काय ?

उत्तर : होय

प्रश्न २ : तूम्हाला गुन्हयाचा तपशील वाचून व समजावून सांगीतला, तो तुम्हाला समजला काय ?

उत्तर : होय

प्रश्न ३ : तूम्हाला सरकारी खर्चाने वकील पाहिजे काय ?

उत्तर : नाही

प्रश्न ४ : तूम्हाला गून्हा कबूल आहे काय ?

उत्तर : होय, मला गुन्हा कबुल आहे

१. ...................................
आरोपीची सही

दिनांक : ११.०८.२०२६

11/08/2026

एस. पी. वानखडे
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. १, उरण.

## न्यायनिर्णय

### (दिनांक ११.०८.२०२६ रोजी पारीत)

आरोपी हजर. आरोपीला गुन्हयाचा तपशिल त्याचे भाषेत वाचुन व समजावून सांगीतला. त्याने गुन्हा कबुल असल्याचे सांगीतले. त्याने त्याबाबत निशाणी

क्र. २ वर पुरसीस दाखल केली. तो स्वेच्छेने गुन्हा कबुल करतो याची मी खात्री केली यानंतर मी त्याची कबुली मान्य केली व त्याला दोषी ठरविले.

आरोपीचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकले. त्याने कमीत कमी दंड करावा अशी विनंती केली. त्यामुळे गुन्हयाचे स्वरूप व सर्व परीस्थीती पाहता मी न्यायाचे दृष्टीने पुढील आदेश पारीत आहे.

## आ दे श

१. आरोपी **सलमान अकबर अली** यांना भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम २७५ अन्वये त्याचेवर लावलेले मोटर वाहन कायद्याचे कलम १८५, १३०(१)/१७७ अन्वये शिक्षापात्र गुन्हयात दोषी ठरवुन त्याला २१००/- (दोन हजार शंभर रूपये फक्त) दंडाची शिक्षा ठोठावण्यात येते व ती दंडाची रक्कम न भरल्यास १५ दिवसाची साधी कैद देण्यात येते.

२. आरोपीस न्यायनिर्णयाची प्रत मोफत देण्यात यावी.

11/08/2026

दिनांक : ११.०८.२०२६

एस. पी. वानखडे
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. १, उरण.

दंडाची रक्कम रु. पा. नं. ७०६/२०२६
२१००/- (दोन हजार शंभर) जमा

4

11/08/2026
सहायक अधिक्षक
फौजदारी न्यायालय, उरण